CMYK

**सोलापुरात विक्रीला आल्या सरपंच, उपसरपंच, खासदार आणि आमदार कडबाकटिंग मशिन्स**
>> पान 2

**स्वामित्व योजनेने ग्रामीण भागाच्या विकासाला नवी दिशा मिळते आहे : आ. निरंजन डावखरे**
>> पान 3

**नववर्षाच्या पार्श्वभुमीवर राज्य उत्पादन शुल्क विभाग सक्रीय**
>> पान 4

दैनिक
# आपला विदर्भ



**कार्तिक आर्यनचा 'भूल भुलैया ३' 'या' दिवशी Netflix वर होणार रिलीज**
आतील पान

**सुविचार**
प्रश्न विचारणे ही ज्ञानाच्या शोधाची पहिली पायरी आहे.

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 136 ■ शुक्रवार, दि. 27 डिसेंबर 2024 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

# माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांचे निधन



**नवी दिल्ली : भारताचे माजी पंतप्रधान डॉक्टर मनमोहन सिंग यांचे गुरुवारी रात्री नवी दिल्ली येथे वयाच्या ९२ व्या वर्षी निधन झाले. ते सलग दहा वर्षे भारताचे पंतप्रधान होते. भारताचे माजी पंतप्रधान डॉक्टर मनमोहन सिंग यांचे गुरुवारी रात्री निधन झाले. अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्था अर्थात एम्सने त्यासंबंधीची अधिकृत घोषणा केली. डॉक्टर मनमोहन सिंग यांच्यावर वृद्धपकाळामुळे उपचार सुरू होते. दिनांक २६ रोजी ते आपल्या घरी अचानक बेशुद्ध पडले, त्यानंतर त्यांना रात्री आठ वाजून सहा मिनिटांनी एम्स येथे दाखल करण्यात आले होते.**

त्यांच्यावर आपत्कालीन उपचार तत्काळ सुरू करण्यात आले, मात्र त्यांनी उपचारांना प्रतिसाद दिले नाही आणि रात्री नऊ वाजून ५१ मिनिटांनी त्यांचे निधन झाले, अशी माहिती एम्स तर्फे देण्यात आली आहे. डॉक्टर मनमोहन सिंग हे सलग दहा वर्षे देशाचे पंतप्रधान होते. २००४ साली काँग्रेस प्रणित संयुक्त पुरोगामी आघाडीस बहुमत मिळाले, त्यावेळी मनमोहन सिंग यांना पंतप्रधान करण्यात आले. पुढे २००९ साली त्यांच्या नेतृत्वाखाली संयुक्त पुरोगामी आघाडीने पुन्हा बहुमत मिळवले आणि डॉक्टर मनमोहन सिंग हे सलग दुसऱ्यांदा पंतप्रधान झाले होते.

डॉक्टर मनमोहन सिंग हे जागतिक दर्जाचे अर्थतज्ञही होते. डॉ.मनमोहन सिंग हे भारताचे माजी पंतप्रधान आणि सुप्रसिद्ध अर्थतज्ञ होते. १९९१ मध्ये त्यांनी देशाच्या आर्थिक सुधारणांमध्ये महत्त्वाची भूमिका बजावली. अर्थमंत्री म्हणून त्यांनी उदारीकरण, खाजगीकरण आणि जागतिकीकरणाची धोरणे राबवून भारतीय अर्थव्यवस्थेला नवी दिशा दिली. त्यांच्या योगदानासाठी त्यांना पद्मविभूषणसह अनेक प्रतिष्ठित पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. १९९१ मध्ये पीव्ही नरसिंह राव सरकारमध्ये अर्थमंत्री म्हणून डॉ. मनमोहन सिंग यांनी भारतीय अर्थव्यवस्थेला आकार दिला. त्यांनी उदारीकरण, खाजगीकरण आणि जागतिकीकरणाची धोरणे स्वीकारली. या धोरणांमुळे देशाची अर्थव्यवस्था जागतिक बाजारपेठेसाठी खुली झाली. यामुळे खाजगी क्षेत्राला प्रोत्साहन मिळाले आणि परदेशी गुंतवणूक आकर्षित झाली. त्यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेत झपाट्याने वाढ झाली होती.

देशाचे माजी पंतप्रधान व अर्थतज्ज्ञ डॉ. मनमोहन सिंग यांचे निधन झाले. मनमोहन सिंग यांना दिल्लीतील एम्स रुग्णालयात उपचाराकरिता दाखल करण्यात आले होते. अखेर वयाच्या ९२व्या वर्षी उपचारादरम्यान डॉ. मनमोहन सिंग यांची प्राण ज्योत मालविली. त्यांच्या निधनाने देशाने जागतिक किर्तीचा अर्थतज्ज्ञ आज गमावला आहे. एकेकाळी पंतप्रधानांचे आर्थिक सल्लागार म्हणूनही व २००८ साली जागतिक मंदीत तत्कालीन पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांच्याच सक्षम आर्थिक धोरणामुळे देशाच्या अर्थव्यवस्थेस मजबूती मिळाली होती.

२००४ ते २०१४ सलग दहा वर्ष डॉ. मनमोहन सिंग यांनी देशाचे पंतप्रधानपद भूषविलं. जगभरात अर्थतज्ज्ञ म्हणून त्यांनी ख्याती मिळविली. आरबीआयचे गव्हर्नर म्हणूनही त्यांनी चोख कामगिरी बजावली होती. विशेष म्हणजे १९९१ साली पी.व्ही. नरसिंहराव पंतप्रधान असताना त्यांच्या मंत्रिमंडळात मनमोहन सिंग यांनी केंद्रीय अर्थमंत्र्याची जबाबदारी पार पाडली होती. याच काळात त्यांनी केलेल्या आर्थिक सुधारणा आणि त्यानंतर झालेल्या आर्थिक प्रगतीमुळे त्यांची कार्यक्षम राजकारणी म्हणून देशात प्रतिमा बनली.


## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केला शोक

माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांच्या निधनावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शोक व्यक्त केला आहे. पंतप्रधान मोदी म्हणाले, 'भारतातील सर्वात प्रतिष्ठित नेते डॉ. मनमोहन सिंग यांच्या निधनाने शोक व्यक्त होत आहे. सामान्य कुटुंबातून उदयास आलेले ते एक प्रसिद्ध अर्थतज्ञ बनले. त्यांनी अर्थमंत्र्यांसह विविध सरकारी पदे भूषवली आणि गेल्या काही वर्षांत त्यांनी आपल्या आर्थिक धोरणावर एक मजबूत छाप सोडली. त्यांचा संसदेतील हस्तक्षेपही व्यावहारिक होता. आपले पंतप्रधान या नात्याने त्यांनी लोकांचे जीवनमान सुधारण्यासाठी व्यापक प्रयत्न केले.

## कासेगाव येथील यल्लमा देवीच्या यात्रेला सुरुवात



दैनिक आपला विदर्भ



**पंढरपूर/प्रतिनिधी :** तृतीयपंथी वर्गाची यात्रा म्हणून पंढरपूर तालुक्यातील यल्लमा देवीचे यात्रेकडे पाहिले जाते. या यात्रेचा पहिला दिवस पंढरपुरातून सुरू होतो. पंढरपुरात यल्लमा देवीच्या जग अर्थात देवीच्या मुर्त्यांची मिरवणूक निघते. परंपरेप्रमाणे वैभव जोशी यांच्या घरामध्ये तृतीयपंथी यांच्या माहेरपणाचा मानपान होऊन यल्लमा देवीचे सर्व जग कासेगाव कडे मार्गस्थ होतात. कासेगाव येथील यल्लमा देवीचे यात्रेचा उद्या मुख्य दिवस साजरा होणार आहे. त्यासाठी महाराष्ट्र सह कर्नाटक व आंध्र प्रदेश येथून तृतीयपंथी व देवदासी येत असतात. हे सारे देवदासी व तृतीयपंथी आजपासून पंढरपुरात दाखल व्हायला सुरुवात झाली आहे.

## वक्फ बोर्डाच्या जमिनीवर अतिक्रमण करणाऱ्यांवर कारवाई होणार




दैनिक आपला विदर्भ

**जालना/प्रतिनिधी :** वक्फ बोर्डाच्या जमिनीवर अतिक्रमण करणाऱ्यांवर कारवाई होणार असल्याची माहिती वक्फ बोर्डाचे अध्यक्ष समीर काझी यांनी दिली आहे. समीर काझी यांनी जालन्याचे शिवसेनेचे आमदार अर्जुन खोतकर यांची भेट घेतली. महाराष्ट्रात जवळपास वक्फ बोर्डाच्या ६० टक्के जमिनीवर अतिक्रमण केले आहे. त्यामुळे आधी मनुष्यबळ कमी असल्यानं कारवाई होत नव्हती. मात्र आता पुरेसा मनुष्यबळ असल्यामुळे अतिक्रमण करणाऱ्यांवर कारवाई केली जाणार आहे असे समीर काझी यांनी सांगितले आहे.

## श्रद्धा सबुरी: ८५ वर्षाच्या भाविकाने शेती विकली: आयुष्यभराची ३ लाखाची कमाई साईचरणी अर्पण

**शिर्डी/प्रतिनिधी :** अंगावर मळालेले कपडे, अनवाणी पाय. . .डोक्यावर वाढलेल्या जटा, थरथरणारे हात . . .कोणी आधुनिक तोऱ्यात मिरवणाऱ्यांनी तिरस्कार करावा, असा जटाधारी अवतार. मात्र या साध्यासुध्या वाटणाऱ्या ८५ वर्षीय भाविकाने आपली जमीन विकून आयुष्यभराची कमाई साईचरणी अर्पण केली. मळक्या वाटणाऱ्या या भाविकाने तब्बल ३ लाखाची देणगी साईचरणी अर्पण केल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. फक्त साईचरणीच ३ लाख अर्पण केले असे नाही, या भाविकाने जनार्दन स्वामींसह अनेक संस्थांना देणगी दिली आहे. त्यामुळे दिसते तसे नसते, या म्हणीचा इथं प्रत्य आला. नरसिंगराव बंडी असे या आयुष्याची कमाई साईचरणी अर्पण करणाऱ्या भाविकाचं नाव आहे. ते मूळचे हैदराबादचे असून सध्या हिंगोलीत राहतात.

## लोणावळ्यात खाकी वर्दीतील रक्षकचे झाले भक्षक

**पुणे/प्रतिनिधी :** पुण्यातून एक खळबळजनक माहिती समोर आली आहे. लोणावळ्यात एका पोलिसाने दारूच्या नशेत एका चिमुकलीसोबत अील चाळे केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. विसापूर किल्ल्याच्या पायथ्याला एका पोलीस शिपायाने चिमुकलीसोबत अील चाळे केल्याचं समोर आलं आहे. कर्तव्यावर असताना हा पोलीस दारूच्या नशेत होता, याचं नशेत त्याने पाच वर्षीय चिमुरडीसोबत अील चाळे केले आहेत. याप्रकरणी सचिन सस्तेला लोणावळा ग्रामीण पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. हा धक्कादायक प्रकार काल (दि २५) रोजी घडला.

नाताळची सुट्टी असल्यानं पर्यटक विसापूर किल्ल्यावर गर्दी करत होते, म्हणून आरोपी पोलीस सस्ते तिथं बंदोबस्तावर होता. तिथल्याच एका हॉटेलमधून त्याने भाकरी घेतली आणि जेवण केलं. त्या भाकरीचे बिल द्यायला तो हॉटेलमध्ये आला, तेव्हा मात्र तो दारूच्या नशेत होता. त्यावेळी तिथं पाच वर्षीय चिमुरडीला आरोपी सस्तेने पाहिलं. लघुशंकेचा बहाणा करून तो हॉटेलच्या मागे गेला आणि चिमुकलीसोबत अील चाळे केले. मुलीने विरोध केला, मग तुला चॉकलेट देतो हे कोणाला सांगू नकोस असं तो तिला म्हणाला. मात्र घडला प्रकार मुलीने आईला सांगितला आणि या नराधम पोलिस रस्तेचं बिंग फुटलं. ज्या लोणावळा ग्राम ीण पोलीस स्टेशनमध्ये तो कार्यरत होता, त्याचं पोलिसांनी त्याला अटक केली आहे.

ही घटना कशी घडली ??

विसापूरच्या पायथ्याशी राहणारी पीडित मुलगी वाळूच्या ढिगाऱ्यावरती खेळत होती. या दरम्यान जेवायला आलेला आरोपी पोलीस दारूच्या नशेत होता. त्यानंतर त्याने पीडित मुलीला चॉकलेट देण्याच्या बहाण्याने जवळ बोलावून तिच्यावर लैंगिक अत्याचार केले . या धक्कादायक प्रसंगानंतर चिमुकलीने तिच्या आईकडे येऊन घडलेली घटना सांगितली. त्यानंतर पीडित मुलीच्या घरच्यांनी पोलिसांना बोलावून हे प्रकरण उघडकीस आणले.

## आमदार बालाजी किणीकरांच्या हत्येचा कट रचणाऱ्या दोघांना अटक, तर दोघे फरार; गुन्हे शाखेची कारवाई

दैनिक आपला विदर्भ

**ठाणे/प्रतिनिधी :** अंबरनाथचे शिवसेना शिंदे गटाचे आमदार डॉ. बालाजी किणीकर यांच्या हत्येचा कट रचल्याच्या प्रकरणात अंबरनाथ शहरातून दोघांना ठाण्यातील गुन्हे शाखेकडून ताब्यात घेण्यात आलंय. तर या हत्येचा कटातील दोन जण फरार झाले आहेत. पोलीस पथक त्याच्या शोधासाठी दिल्लीत दाखल झाले असून, लवकरच दोन्ही आरोपींना अटक होण्याची शक्यता वर्तविली जातेय. मात्र अटक केलेल्या दोन्ही आरोपींची नावे पोलिसांनी गुप्त ठेवलीत.

किणीकर यांच्या पोलीस बंदोबस्तातदेखील वाढ : आमदार किणीकर हे अंबरनाथ मतदारसंघातून चौथ्यांदा आमदार म्हणून निवडून आलेत. शिवाय ते उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचे जवळचे आणि विश्वासू आमदार आहेत. ते आपल्या भावाच्या मुलाच्या लग्नासाठी लातूरला जाणार होते. त्याच लग्न समारंभाच्या ठिकाणी त्यांची हत्या करण्याचा डाव होता. मात्र याची पोलिसांना माहिती मिळताच पोलिसांनी अंबरनाथ शहरातून दोघांना ताब्यात घेतलंय. एकाला खुंटवली गावातून तर दुसऱ्याला स्वामीनगरमधून ताब्यात घेऊन अटक करण्यात आलीय. शिवाय किणीकर यांच्या पोलीस बंदोबस्तातदेखील वाढ करण्यात आलीय.



दरम्यान, याप्रकरणी किणीकर समर्थक आक्रमक झाले असून, अंबरनाथ बंदची हाक दिली जाणार असल्याचं सांगितलं जातंय. किणीकर या संदर्भात लग्नाहून आल्यानंतर पत्रकार परिषद घेणार आहेत.

यापूर्वीही ठार मारण्याच्या धमक्या : विशेष म्हणजे ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ शहरातील राजकीय नेत्यांचा हत्येचा इतिहास पाहता आठवले गटाचे नरेश गायकवाड, भाजपाचे वसंत पांढरे, शिवसेनेचे नितीन वारिंगे, प्रसन्ना कुलकर्णी यांच्यासह देवराम वाळूंज, किशोर सुळे, रमेश गोसावी, अशोक गायकवाड या नेत्यांची हत्या झालीय. खळबळजनक बाब म्हणजे आमदार किणीकर यांना यापूर्वीही ठार मारण्याच्या धमक्या दिल्या जात होत्या. आता पोलीस त्याच दिशेनं पुन्हा तपास करीत असल्याचे सांगण्यात आलंय. या गुन्ह्यातील सर्व आरोपींच्या अटकेनंतर आमदारांची हत्या कोण आणि कशासाठी करणार होते हे तपासात पुढे येणार असल्याची माहिती पोलीस अधिकाऱ्यांनी दिलीय.

## नांदेड पोलिसांची मोठी कामगिरी; हत्या, दरोडा खंडणीचे गुन्हे उघडीस आणण्यास मोठे यश



दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी :** आज नांदेड जिल्ह्याची एसपी अविनाश कुमार यांनी पत्रकार परिषद घेऊन वेगवेगळ्या गुन्ह्यांची माहिती दिली आहे. कंधार येथे एका महिलेचा खून करण्यात आला असून त्यातील आरोपीला कंधार पोलिसांनी अटक केली आहे. तर रिंदाच्या नावाने खंडणी मागणाऱ्या आरोपीला देखील नांदेड क्राईम ब्रँचने अटक केली. तसेच भाग्यनगर पोलीस स्टेशन मध्ये घरफोडी करणाऱ्या आरोपीला देखील अटक करण्यात आली आहे. त्याच्याकडून मुद्देमाल जप्त करण्यात आला. सायबर सेलच्या वतीने विविध नागरिकांचे चोरीस गेलेले मोबाईल हे पकडण्यात पोलिसांना यश आले असून सव्वाशेच्या वर मोबाईल आरोपींकडून हस्तगत करण्यात आले तर आरोपींना अटक करण्यात आली आहे. नवीन वर्षाच्या अनुषंगाने पोलीस प्रशासनातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात आले आहे की कोणीही दारू पिऊन पिऊ नये व पोलीस प्रशासनाला सहकार्य करावे. पोलीस प्रशासन आपल्या मदतीसाठी तत्पर सहकार्य ठेवेल पण असा कुठलाही पाऊल नागरिकांनी व युवा पिढीने उचलू नये जेणेकरून पोलिसांना कारवाई करावी लागेल अशी देखील विनंती पोलीस प्रशासनाने नागरिकांना केली आहे.

## पोलिसांनी अटक केली तेव्हा काय करत होता कल्याणचा नराधम? सीसीटीव्ही फुटेज समोर

दैनिक आपला विदर्भ

**कल्याण/प्रतिनिधी :** कल्याण येथे १३ वर्षीय अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार आणि हत्या करण्यात आल्याची खळबळजनक घटना घडली आहे. या प्रकरणातील मुख्य आरोपी विशाल गवळी याला पोलिसांनी बुलढाणा जिल्ह्यातील शेगाव येथून अटक करण्यात आली आहे. अल्पवयीन तरुणीची हत्या केल्यानंतर आरोपी पत्नीच्या गावी पळून गेला होता. पोलिसांनी त्याला तिथून अटक करण्यात आली. सलूनमध्ये बसला असतानाच पोलिसांनी ही कारवाई केली आहे. पोलीस अटक करत असतानाचे सीसीटीव्ही फुटेज समोर आलं आहे.

कल्याण कोळशेवाडी येथे १३ वर्षीय अल्पवयीन मुलीच्या अपहरणानंतर निर्घृण हत्या करण्यात आल्याच्या घटनेने परिसरात खळबळ उडाली होती. अल्पवयीन मुलगी संध्याकाळपासून बेपत्ता होती. आरोपीने तरुणीने त्याच्या घरी नेले आणि तिच्यावर अत्याचार केला. नंतर विशालने तिची हत्या करुन तिला मृतदेह बॅगेत भरला. नंतर एका मित्राच्या रिक्षातून मृतदेह नेला आणि बापगाव येथे नेऊन मृतदेहाची विल्हेवाट लावण्यात आली.

धक्कादायक म्हणजे आरोपी विशाल गवळीचे दोन सीसीटीव्ही फुटेज समोर आले आहेत. पहिल्या सीसीटिव्हीत मृतदेहाची विल्हेवाट लावल्यानंतर तो एका बारमध्ये गेला तिथे तो दारू प्यायला त्यानंतर पत्नीच्या गावी बुलढाणा येथे निघून गेला. मात्र, पोलिसांना विशाल गवळीच्या घरासमोर रक्ताचे डाग पडल्याचे दिसले त्यानंतर त्यांनी त्याची पत्नी साक्षी गवळीला ताब्यात घेऊन विचारपूस केली तेव्हा हा सगळा घटनाक्रम उघडकीस आला.

आरोपी सलूनमध्ये असताना अटक

आरोपी शेगावमध्ये असल्याची माहिती पोलिसांनी मिळाली. तेव्हा पोलिसाची पथके रवाना झाली होती. पोलिसांनी आरोपीला सलूनमध्ये असताना अटक केली. याचा व्हिडिओदेखील समोर आला आहे. या व्हिडिओत आरोपी खुर्चीवर बसलेला दिसत आहे. तर मागून दोन पोलिस साध्या वेशात येतात आणि आरोपीला ताब्यात घेण्यात आले.




**महाराष्ट्र शासनाच्या सामूहिक सुविधा केंद्र योजनेच्या लाभ घेत महिलेने साधली मसाला उद्योगात समृद्धी**
सविस्तर वृत्त पान ३

CMYK

## ...तर नववर्षाचा आनंद द्विगुणित होईल!

३१ डिसेंबरच्या रात्री नववर्षाचे स्वागत दारू पिऊन करण्याकडे तरुण वर्गाचा कल असतो. नववर्षाच्या पूर्वसंध्येला पब किंवा क्लब मध्ये जाऊन पार्टी करणे, दारू पिऊन गाडी चालवणे, हुल्लडबाजी करणे, सायलंसरच्या पुंगळ्या काढून आवाज करणे, मोठ्या आवाजाचे फटाके वाजवणे, डिजेच्या किंवा लाऊड स्पिकरच्या कर्णकर्कश आवाजात भिभत्स नृत्य करणे यासारख्या गोष्टी तरुण वर्गामार्फत केल्या जातात. यावर्षी तर हे प्रमाण खूपच वाढणार आहे कारण शासनानेच पब, क्लब, रेस्टॉरंट रात्रभर सुरू ठेवण्यास परवानगी दिली आहे. पब, क्लब, रेस्टॉरंट रात्रभर सुरू राहणार असल्याने तरुणांनी आतापासूनच पार्टीची तयारी सुरू केली आहे. नववर्षाचे अशाप्रकारे स्वागत करणे म्हणजे कायदा सुव्यवस्थेचा भंग करणे हे माहीत असूनही अशा गोष्टी केल्या जातात. अलीकडे तर या गोष्टी खूपच वाढल्या आहेत. दारू पिऊन नववर्षाचे स्वागत करण्याची फॅशनच हल्ली रूढ झाली आहे. नववर्षाच्या पूर्वसंध्येला दारू पिलीच पाहिजे असाच समज तरुण वर्गाचा झाला आहे. दारू न पिताही नववर्षाचे स्वागत करता येते यावर त्यांचा विश्र्वासच नाही त्यामुळेच नववर्षाचे स्वागत दारू पिऊनच केले जाते. दारूचे दुष्परिणाम माहीत असूनही या गोष्टी केल्या जातात. दारू पिऊन भरधाव वेगात गाड्या चालवतात. दारू पिऊन भरधाव वेगात गाडी चालवल्याने बऱ्याचदा अपघात होतात. या अपघातात काही जण मरण पावतात तर काही जण जखमी होतात काही तर काही जण कायमचे जायबंदी होतात. दारू पिऊन गाडी चालवल्याने झालेल्या अपघातात घरातील कर्ता पुरुष गेल्याने कुटुंब रस्त्यावर येते. दारू पिऊन गाडी चालवणे म्हणजे स्वतःसह इतरांचाही जीव धोक्यात घालणे म्हणूनच नववर्षाचे स्वागत करताना स्वतःसह इतरांना त्रास होणार नाही याचे भान सर्वांनी ठेवावे. सरत्या वर्षाला निरोप देताना आणि नव्या वर्षाचे स्वागत करताना बंधनाची ऐशीतैशी होणार नाही याची काळजी सर्वांनीच घ्यायला हवी. नववर्षाचे स्वागत म्हणजे चांगल्या वाईट गोष्टी दूर सारुण नववर्षाच्या सूर्योदयाच्या साक्षीने नव संकल्पाचा अवलंब करणे, त्याचे निश्र्चित धोरण ठरवणे, सत्याची कास धरणे आणि नव्या जोमाने, नव्या उत्साहाने कामाला लागणे. यामुळे नव्या वर्षाचे स्वागत करताना पाश्र्चात्यांचे अंधानुकरण बंद करून प्रत्येकाने चांगले काम करण्याचा संकल्प केला पाहिजे. आज जगाचा पोशिंदा संकटात आहे. आस्मानी आणि सुलतानी संकटांने पिचलेला बळीराजा आत्महत्या करीत आहेत. देशाचे रक्षणकर्ते जवान दहशतवाद्यांच्या, नक्षलवाद्यांच्या हल्ल्यात शहीद होत आहेत. दारूच्या नशेत नववर्षाचे स्वागत करण्यापेक्षा आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांची मुले, शहीद जवानांची मुले तसेच अनाथ मुलांना मदत करून आपण नव वर्षाचे स्वागत करू शकतो. आर्थिकदृष्ट्या गरीब कुटुंबाना आर्थिक मदत करून त्यांच्या मुलांचे शैक्षणिक पालकत्व स्वीकारून, गोरगरीब मुलांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करून, वृद्धाश्रमाला, अनाथ आश्रमाला आर्थिक मदत करून आपण नववर्ष साजरे करू शकतो. रक्तदान म्हणजे सर्वश्रेष्ठ दान. नववर्षाची सुरुवात जर आपण रक्तदान करून केली तर एखाद्या रुग्णाचे प्राण वाचवल्याचे समाधान आपल्याला मिळू शकते. नवीन वर्षात अवयव दानाचा संकल्पही आपण करू शकतो. छोटे छोटे संकल्प आपल्याला भविष्यात मोठा फायदा करून देणारे ठरू शकतात त्यामुळे आपले आणि आपल्या प्रिय जणांचे जीवन अधिक समृध्द आणि अर्थपूर्ण होऊ शकते. जुने जाऊ द्या मरणागुनी..... जाळूनी किंवा पुरूनी टाका.... या कवितेच्या ओळी प्रमाणे मागील वर्षीच्या सर्व चांगल्या वाईट भावना पुसून नव्या वर्षाचे स्वागत करायला हवे. सामाजिक बांधिलकीचे ऋण सेवेतून व्यक्त करण्याचा तसेच अपप्रवृत्तींना आळा घालण्याचा संकल्प केला तर, नववर्षाचा आनंद द्विगुणित होईल.

# सोलापुरात विक्रीला आल्या सरपंच, उपसरपंच, खासदार आणि आमदार कडबाकटिंग मशिन्स

दैनिक आपला विदर्भ

**सोलापूर/प्रतिनिधी :** सोलापूरच्या श्री सिद्धेश्वर कृषी प्रदर्शनात सरपंच,उपसरपंच,खासदार आणि आमदार नावाच्या कडबाकटिंग मशिन्स सर्वांचं लक्ष वेधून घेतायत. पशुपालकांसाठी अतिशय महत्वाचं असणाऱ्या कडबाकटिंग मशीनला अशी आकर्षक नाव दिल्याने सोलापुरातील कृषी प्रदर्शनात हा चर्चेचा विषय बनला आहे.

सांगली जिल्ह्यातील भाळवणीच्या नजराना प्रोडक्शन कडून या कडबाकटिंग मशिन्स कृषी प्रदर्शनात विक्रीसाठी आणल्या आहेत.







यामध्ये खासदार कडबाकटिंग मशीनची किंमत ५५ हजार रुपये असून ती ताशी दोन टन कडबा कट करते. आमदार मशीनची किंमत ३५ हजार रुपये असून ती ताशी एक टन कडबा कट करते.सरपंच मशीन ही २९ हजार ५०० रुपये असून ती ताशी अर्धा टन कडबा कट करते.तर ज्या शेतकऱ्यांकडे १० जाणवरे आहेत त्यांच्यासाठी उपसरपंच ही मशीन बनवण्यात आली असून त्याची किंमत २७ हजार ५०० रुपये आहे.

सध्या जवळपास ६० पशुपालकांनी या मशिन्स खरेदी केल्या असून यांना पाहण्यासाठी पशुपालक मोठ्या संख्येने गर्दी करत असल्याच चित्र दिसून येत आहे.

# कार्तिक आर्यनचा 'भूल भुलैया ३' 'या' दिवशी Netflix वर होणार रिलीज

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** कार्तिक आर्यन, माधुरी दीक्षित आणि विद्या बालन यांचा सुपरहिट चित्रपट 'भूल भुलैया ३' ने बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घातल्यानंतर आता हा चित्रपट ओटीटीवर रिलीज होणार आहे. कार्तिक आर्यनने स्वत: एक व्हिडीओ शेअर करत ही माहिती दिली आहे. हा चित्रपट २७ डिसेंबर रोजी नेटफ्लिक्सवर रिलीज होणार आहे.

नेटफ्लिक्सने बॉलिवूड अभिनेता कार्तिक आर्यनचा एक व्हिडीओ शेअर केले आहे. ज्यामध्ये 'भूल भुलैया ३' चित्रपट ओटीटीवर प्रदर्शित होणार असल्याची घोषणा करण्यात आलीये. हा व्हिडीओ शेअर करताना कॅप्शनमध्ये म्हटले आहे की, कार्तिक आर्यन त्याच्या मजेदार शैलीत येत आहे. रुह बाबा आणि मंजुलिकाचा चेहरा पाण्यासाठी सज्ज व्हा.

'भूल भुलैया ३' चा बॉक्स ऑफिसवर धमाका



अनीस बज्मी दिग्दर्शित 'भूल भुलैया ३' चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर मोठ्या प्रमाणात कमाई केली. 'भूल भुलैया ३' आणि अजय देवगनचा बहुप्रतिक्षित असणारा 'सिंघम अगेन' हे दोन्ही चित्रपट एकाच दिवशी बॉक्स ऑफिसवर प्रदर्शित झाले होते. अशा परिस्थितीत 'भूल भुलैया ३' बॉक्स ऑफिसवर 'सिंघम अगेन'ला टक्कर देऊ शकणार नाही म्हटले जात होते. मात्र, डरलज्ञपळश्रज्ञ च्या रिपोर्टनुसार, या हॉरर कॉमेडी चित्रपटाने जगभरात ३८९.२८ कोटी रुपयांचा व्यवसाय करून सर्वांना चकित केले.

'भूल भुलैया ३' सोबत रोहित शेट्टी दिग्दर्शित 'सिंघम अगेन' हा चित्रपट प्रदर्शित झाला होता. 'भूल भुलैया ३' चित्रपटापेक्षा खूप बजेट आणि क्शन चित्रपट असूनही अजय देवगनचा 'सिंघम अगेन' चित्रपट कार्तिक आर्यनच्या चित्रपटाला मागे टाकू शकला नाही. 'सिंघम अगेन' चित्रपटाने जगभरातून केवळ ३७२.४ कोटी रुपयांची कमाई केली.


'भूल भुलैया' चित्रपटाचे तिन्ही भाग हिट

'भूल भुलैया ३' हा बॉलिवूड अभिनेता अक्षय कुमारच्या २००७ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'भूल भुलैया' चित्रपटाचा तिसरा भाग होता. त्याचा दुसरा भाग 'भूल भुलैया २' हा चित्रपट २०२२ मध्ये रिलीज झाला होता. या मालिकेतील चित्रपट नेहमीच प्रेक्षकांना आवडतात. त्याच्या तिसऱ्या भागातही असेच घडले. तथापि, मोठ्या संघर्षानंतरही, तिसऱ्या भागाने स्वतःला सिद्ध केले आणि चांगली कमाई केली.

# सतीश वाघ हत्या प्रकरणात धक्कादायक खुलासा; पत्नीच निघाली मास्टरमाईंड

दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी :** पुण्यातील सतिश वाघ हत्या प्रकरणात मोठी अपडेट हाती आली आहे. सतीश वाघ यांच्या हत्येची सुपारी त्यांच्याच पत्नीने दिल्याची माहिती समोर आली आहे. या हत्या प्रकरणात पोलिसांच्या गुन्हे शाखेने वाघ यांच्या पत्नीला अटक करण्यात आली आहे. पोलिसांच्या गुन्हे शाखेच्या धक्कादायक माहितीने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.



सतीश वाघ हत्या प्रकरणात नवा ट्विस्ट समोर आला आहे. वाघ यांच्या हत्या प्रकरणातील मुख्य सूत्रधार अखेर सापडला आहे. सतीश वाघ यांची पत्नीच हत्येच्या मुख्य सूत्रधार निघाली आहे. पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेने या गुन्ह्याची उकल केली आहे. सतीश वाघ यांच्या हत्येचं गूढ उलगडल्याने एकच खळबळ उडाली आहे. या प्रकरणी पोलिसांनी हत्येच्या मास्टरमाईंड सतीश वाघ यांच्या पत्नीला अटक केली आहे. त्यांना आज न्यायालयात दाखल करण्यात येणार आहे.









## छ. संभाजीनगरात महिलांकडून जबरदस्ती वेश्या व्यवसाय करुन घेणाऱ्या आरोपीला पोलिसांनी ठोकल्या बेड्या



दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजी नगर/प्रतिनिधी :** छत्रपती संभाजीनगर शहरातील रेल्वे परिसरात असलेल्या हॉटेल किचन किंग मध्ये काही महिलांकडून जबरदस्ती वेश्या व्यवसाय करुन घेण्यात येत असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना प्राप्त झाली होती. या माहितीवरुन वेदांत नगर पोलिसांनी त्या ठिकाणी छापा टाकत दोन महिलांची सुटका केली आहे. या प्रकरणात एका आरोपीला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. त्याच्या विरोधात वेदांत नगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील महिलांना सुधार गृहामध्ये पाठवण्यात आले आहे.






DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# स्वामित्व योजनेने ग्रामीण भागाच्या विकासाला नवी दिशा मिळते आहे : आ. निरंजन डावखरे

दैनिक आपला विदर्भ

**ठाणे/प्रतिनिधी :** कोकण पदवीधर मतदारसंघाचे विधान परिषदेचे आमदार निरंजन डावखरे यांच्या अध्यक्षतेखाली स्वामित्व योजनेवर पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती. ग्रामीण भागातील नागरिकांना त्यांच्या मालमत्तेवर मालकी हक्क सिद्ध होण्यासाठी आणि आर्थिक सक्षमता प्राप्त करण्यासाठी ही योजना अत्यंत महत्त्वपूर्ण ठरली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून सुरू झालेल्या या योजनेच्या माध्यमातून ग्रामीण महाराष्ट्रातील ३०,५१५ गावांमध्ये मालमत्ता पत्र (प्रॉपर्टी कार्ड) तयार करण्याची प्रक्रिया सुरू आहे. आज अखेर १५,३२७ गावांमध्ये मालमत्ता पत्रे वाटप करण्यात आली असून, २३,१३२ गावांचे अंतिम नकाशे तयार झाले आहेत.

आमदार निरंजन डावखरे यांनी पत्रकार परिषदेत बोलताना सांगितले की, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रफडणवीस यांनी सांगितल्या प्रमाणे महाराष्ट्र आता थांबणार नाही. स्वामित्व योजनेमुळे गावकऱ्यांना त्यांच्या जमिनीचा मालकी हक्क मिळत आहे. यामुळे घरकर्ज आणि अन्य आर्थिक सुविधांमध्ये सुलभता निर्माण होत आहे. गावकऱ्यांच्या मालमत्तेचे मूल्य वाढत असून, त्यांची आर्थिक पत उंचावण्यासाठी ही योजना उपयुक्त ठरत आहे. याशिवाय, मालमत्तेच्या स्पष्ट नोंदी झाल्यामुळे ग्रामपंचायतींना करआकारणी सुलभ होत आहे आणि विकासकामांना गती मिळत आहे. डिजिटल इंडिया आणि आत्मनिर्भर भारत या संकल्पनांच्या दिशेने टाकलेले हे मोठे पाऊल असल्याचे त्यांनी नमूद केले. या योजनेच्या अंमलबजावणीमुळे जमिनीच्या मोजणी प्रक्रियेत पारदर्शकता आली आहे. ड्रोनच्या साहाय्याने जमिनीचे अत्याधुनिक पद्धतीने मोजमाप केले जात आहे. मोजणीवेळी ग्रामसेवक, राजस्व विभागाचे अधिकारी, संबंधित जमीन मालक आणि शेजारी यांची उपस्थिती सुनिश्चित केली जाते. योजनेच्या माध्यमातून आदिवासी बांधव, वाढीव वस्तीतील रहिवासी यांना त्यांच्या मालमत्तेचे कायदेशीर कागदपत्र मिळत आहेत, ज्यामुळे त्यांच्या हक्कांचे संरक्षण होत आहे. भूमाफियांना आळा बसला असून, बेकायदेशीर ताब्यावर नियंत्रण मिळाले आहे.




गावकऱ्यांच्या सक्षमीकरणासाठी आणि ग्रामपंचायती स्वयंपूर्ण बनवण्यासाठी स्वामित्व योजना ही क्रांतिकारक पाऊल ठरली आहे. महाराष्ट्रातील ग्रामीण भागाचा चेहरामोहरा बदलण्यासाठी आणि ग्रामविकासाला गती देण्यासाठी सरकार कटिबद्ध असल्याचे आमदार डावखरे यांनी सांगितले आहे.

## महत्त्वाचे...

### राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी खोपोली बस स्थानकाची केली पाहणी



दैनिक आपला विदर्भ

**रायगड/प्रतिनिधी :** राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी खोपोली बस स्थानकाची पाहणी केली. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी पनवेल ते खोपोली एसटी बसने प्रवास करत प्रवाशांशी संवाद साधला. त्यांनी प्रवाशांकडून समस्या जाणून घेतल्या. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी खोपोली बस स्थानकाचा आढावा घेत बस स्थानकाची जागोजागी जाऊन प्रत्यक्षात पाहणी केली. प्रवाशांच्या काही प्राथमिक गरजा आहेत जसं एसटी वेळेत आली पाहिजे, फेऱ्या वाढवल्या पाहिजे, प्रसाधनगृह स्वच्छ असले पाहिजे, पिण्यासाठी पाणी असावे. या सर्व सुविधा पुरवणे आपले कर्तव्य आहे अशी प्रतिक्रिया परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली आहे.

### आमदार आनंद पाटील बोंडारकर यांनी घेतला महापालिकेचा आढावा



दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी :** नांदेड दक्षिणचे नवनिर्वाचित आमदार यांनी महानगरपालिका आयुक्त यांच्या समवेत शासकीय विश्रामगृह येथे महानगरपालिकेचा आढावा घेतला. प्रशासनाला नांदेड दक्षिण मतदार संघामध्ये विविध प्रकारच्या समस्या असून त्या सोडवण्याकरिता आमदार आनंद पाटील भांडारकर यांनी सूचना दिल्या आहेत. कुठल्याही समस्या सोडवण्यासाठी मी कटिबद्ध असून महानगरपालिकेला निधी कमी पडत असल्यास माझ्याकडे प्रस्ताव पाठवावे ते शासन स्तरावर मी पूर्ण करेल तसेच गोदावरी शुद्धीकरणाचा प्रश्न्न हा प्रामुख्याने मी हाती घेतला असून यासाठी प्रयत्न करणार आहे अशी प्रतिक्रिया आमदार आनंद पाटील बोंढारकर यांनी दिली आहे.

### कल्याण प्रकरणाच्या निषेधार्थ पूर्वेत नागरिकांचा कॅण्डल मार्च






दैनिक आपला विदर्भ

**कल्याण/प्रतिनिधी :** अपहरण करून अत्याचार आणि नंतर निर्घृण हत्या करणाऱ्या आरोपी विशाल गवळी याला फाशी फाशीची शिक्षा द्यावी यासाठी संतप्त नागरिकांनी कल्याण पूर्वेत कॅण्डल मार्च काढून आक्रोश व्यक्त केला आहे. या कॅन्डल मार्च मध्ये कल्याण पूर्व येथील हजारो नागरिक सहभागी झाले होते. कायदा आणि सूर व्यवस्थेचा प्रश्न्न निर्माण होऊ नये यासाठी पोलीस प्रशासनाने तगडा बंदोबस्ता तैनात केला होता. या संपूर्ण घटनेचा निषेध व्यक्त करण्यासाठी कल्याणातील महिला पुरुष बुजुर्ग व्यक्तींनी या कॅण्डल मार्च मध्ये सहभागी होऊन आरोपीला जास्तीत जास्त कठोर कारवाईचे मागणी लावून धरली.

### झहीर खान यांनी सपत्नीक श्री साईबाबांच्या समाधीचे घेतले दर्शन



**शिर्डी/प्रतिनिधी :** भारतीय क्रिकेट संघाचे माजी खेळाडू झहीर खान यांनी सपत्नीक श्री साईबाबांच्या समाधीचे दर्शन घेतले. दर्शनानंतर श्री साईबाबा संस्थानचे वतीने मंदीर प्रमुख विष्णु थोरात व जनसंपर्क अधिकारी तुषार शेळके यांनी त्यांचा शाल व श्री साई मुर्ती देवून सत्कार केला. यावेळी श्री साईबाबा संस्थानचे संरक्षण अधिकारी रोहीदास माळीउपस्थित होते.

# कल्याण अत्याचार व हत्या प्रकरणावर ठाणे गुन्हे शाखा उपायुक्त अमरसिंह जाधव यांची पत्रकार परिषद

दैनिक आपला विदर्भ



**ठाणे/प्रतिनिधी :** आरोपीला २ जानेवारी पर्यंत पोलीस कस्टडी सुनावण्यात आली आहे आरोपी विशाल गवळी आणि त्याच्या पत्नी साक्षी गवळी अटक करण्यात आली आहे कोळसेवाडी पोलीस ठाण्याचे पोलीस पुढील तपास करत आहेत विशाल गवळी वर ८ गुन्हे दाखल आहेत गुन्हा कसा केला, हत्यार कोणते वापरले अजून कोणी सहभागी आहे का ? याचा तपास होणार- मुलीवर अत्याचार मद्यप्राशन करून केला का ? याचाही तपास होईल आरोपीने मृतदेहाची विल्हेवाट लावताना कोणाची मदत घेतली तसेच अजून कोणी सहभागी होते का ? या सर्वांचा तपास करून कायदेशीर कारवाई केली जाणार. हा गुन्हा अतिशय संवेदनशील आहे, याचा बारकाईने तपास होईल आरोपी मानसिक रुग्ण आहे का व आरोपीने गुन्हा करून पळून जाताना त्याला कोणी मदत केली याचाही तपास होणार.आरोपीला शिक्षा होण्याच्या दृष्टीने सर्व तपास केला जाईल ७ ऑक्टोबर २०२२ ला संदीप अडळसूळ हा बांधकाम व्यासायिकावर गोळीबार झाला होता यातील आरोपी हे कन्स्ट्रक्शन साईटवर काम करत होते अज्ञात आरोपीने फायरिंग केले याला २ वर्ष उलटून गेले तपास आणि गोपनीय माहितीनुसार ५ आरोपींना अटक केली आहे.या मध्ये अजून कोणाचा सहभाग आहे का याचाही तपास सुरु आहे- आर्थिक देवाण घेवाणीच्या वादातून हा गोळीबार झाला आहे..

## पुण्यात दोन चिमुरड्यांवर लैंगिक अत्याचार अन् खून; मृतदेह आढळले पाण्याच्या ड्रममध्ये, पोलीस स्टेशनबाहेर नातेवाईकांचा ठिय्या

**पुणे/प्रतिनिधी :** पुण्यातील राजगुरुनगर येथील पोलीस स्टेशन बाहेर नागरिकांचा ठिय्या आंदोलन सुरू आहे पोलिसांसोबत चर्चा करून नातेवाईक आंदोलनावरती ठाम आहेत पुण्यातील राजगुरुनगर मध्ये झालेल्या दोन अल्पवयीन मुलींच्या हत्यानंतर नातेवाईक संतप्त झाले आहेत दोन सख्ख्या बहिणींचे मृतदेह ड्रम मध्ये आढळून आले होते या चिमुकल्या मुलींच्या घराशेजारीच राहत असलेल्या एका ५४ वर्षाच्या नराधम ाने मुलींवरती अत्याचार करून त्यांचा खून केल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे यासंदर्भात सध्या कुटुंबीय आणि नातेवाईक संतप्त झाले आहेत त्यांनी पोलीस स्टेशन बाहेर या आंदोलन केला आहे.

## नाशिकच्या त्र्यंबकेश्वर मंदिरात व्हीआयपी दर्शन बंद!

**नाशिक/प्रतिनिधी :** नाशिकमधील त्र्यंबकेश्वर मंदिरात भाविकांची नेहमीच मोठी गर्दी असते. अशातच सध्या नाताळची सुट्टी सुरु असून अनेकजण विविध पर्यटनस्थळांसह देवदर्शनासाठी जातात. त्यामुळे त्र्यंबकेश्वर मंदिरात दिवसागणिक भाविकांची संख्या वाढत चालली आहे. भाविकांची मोठी गर्दी पाहता अनेकजण व्हीआयपी दर्शनाला पसंती देत आहेत. मात्र यामुळे इतर रांगेतील भाविकांची होणारी गैरसोय पाहता मंदिर प्रशासनाने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे.

नाताळ सुट्ट्यांमुळे होणारी गर्दी लक्षात घेता नाशिकच्या त्र्यंबकेश्वर मंदिर प्रशासनाने पुढील काही दिवस त्र्यंबकेश्वर मंदिरातील व्हीआयपी दर्शन बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. राज शिष्टाचार संबधी अतिमहत्त्वाचे व्यक्ती वगळता इतर भाविकांसाठी येत्या ५ जानेवरी २०२५ पर्यत व्हीआयपी दर्शन सेवा बंद असणार आहे.

## गांजेगाव येथे अखंड हरीनाम सप्ताहाची उत्साहात सांगता



दैनिक आपला विदर्भ

**उमरखेड/प्रतिनिधी :** वै.ह.भ प.कामाजी बापु गांजेगावकर यांच्या पाचव्या पुण्यतिथी निमित्त गांजेगाव येथे अखंड हरिनाम सप्ताह चे आयोजन करण्यात आले होते. सप्ताहची १७ डिसेंबर ला सुरूवात झाली होती या सप्ताहात किर्तनकार ह.भ.प.सुधीर महाराज पळशीकर,ह.भ.प.पांडूरंग महाराज येहळेगांवकर ह.भ.प.पांडुरंग महाराज बेलमंडळ,ह.भ.प.डॉ. रावते साहेब ढाणकी,ह.भ.प.उमाकांत महाराज नर्सी नामदेव, ह.भ.प. हरिभाऊ महाराज दुर्गसावंगी, ह.भ.प.प्रसाद महाराज पंढरपूर यांनी या सप्ताह मध्ये किर्तनरुपी सेवा प्रधान करत, या आधुनिक युगात मानव समाज हा सुख शोधण्यासाठी आजच्या धकाधकीच्या जीवनात जास्त गुंतला असून तो सुख प्राप्ती पासून दुरावून नैराश्य जीवन जगत आहे.

आज या धकाधकीच्या जीवनात सुख प्राप्त कसे करावे? या साठी सांगता काल्याच्या कीर्तनातुन प्रबोधन करत दु.खाची निवृती..सुखाचे ते सुख पाहताश्रीमुख गोविंदाचे रंजनी रांगतगुलगुला बोलत......नामा म्हणे.....। याअभंगातून मानव जीवन जगण्यासाठी उपाय सांगत,चार आश्रामा पैकी गृहस्थाश्रम महत्वाचा संसारात राहून जीवन मंगलमय करता येते. संसारात राहून संस्कृती, संपत्ती, संतती मिळविणे महत्वाचे असते,मी आणी माझे ही वृत्ती सोडविणे महत्वाचे,मनेरी गाय तिला सांभाळणे,विषय रूपी गाईला सांभाळणे असे महत्वाचे अभंगा द्वारे प्रबोधन केले. या अखंड हरीनाम सप्ताहाची सांगता करण्यासाठी गावातील सर्व नागरिकांचा,तरूणाचा व माता भगिनिंचा उत्स्फूर्त सहभाग होता.

# माजी नगरसेवकाचा अंगावर डिझेल ओतून घेत आत्मदहनाचा प्रयत्न





दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजी नगर/प्रतिनिधी :** छत्रपती संभाजी नगर शहरातील महानगरपालिकेचे कामे जीव्हीपीआर कंपनीला दिले आहे. छत्रपती संभाजीनगरमध्ये पाणी पुरवठाबाबतचे काम या कंपनीला देण्यात देण्यात आले आहे मात्र महापालिकेच्या सर्वच वार्डात कंनीकडून वरच्यावर काम केले जात आहे. या कंपनीकडून ठिकठिकाणी खड्डे खोदून ठेवले आहेत ज्याचा नागरिकांना धोका निर्माण होऊ शकतो. कामं अर्धवट केली असताना सुद्धा शासनाला अहवाल पाठवून १६०० करोड रुपये कंपनीने घेतले आहेत. मात्र आमच्या वार्डातील काम योग्यरीत्या झाले नसल्याचे सांगत माजी नगरसेवक दामू अण्णा शिंदे यांनी अंगावर डिझेल ओतून आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर अधिकाऱ्यांशी चर्चा करताना अधिकाऱ्यांनी लेखी स्वरूपामध्ये लिहून दिले की आम्ही काम आजच चालू करतो. यावेळी नागरिकांनी टायर जाळून नाराजी व्यक्त केली आहे.

# महाराष्ट्र शासनाच्या सामूहिक सुविधा केंद्र योजनेच्या लाभ घेत महिलेने साधली मसाला उद्योगात समृद्धी

दैनिक आपला विदर्भ

**जालना/प्रतिनिधी :** जालना शहरातील इंदिरानगर भागात राहणाऱ्या वंदना दाभाडे या महिलेने आपला मसाला उद्योग हा साता समुद्रापार पोहोचवला आहे. जालना शहरातील इंदिरानगर या झोपडपट्टी वस्तीत राहणाऱ्या वंदना दाभाडे या दिव्यांग पदव्युत्तर शिक्षण घेतलेल्या महिला आहेत. गेल्या दहा ते बारा वर्षापासून वंदना दाभाडे मसाला उद्योग क्षेत्रात आहेत. हा मसाला उद्योगाची त्यांनी अवघ्या पाच हजार रुपयांवर सुरुवात केली असून आता यात त्यांना चांगला नफा मिळत आहे. उद्योग सुरु करत असताना त्यांनी महाराष्ट्र शासनाच्या सामूहिक सुविधा केंद्र या योजनेअंतर्गत कर्ज घेत अवघ्या पाच लाख रुपयांत त्यांनी भांडवल तयार केले व त्यातून मशीन खरेदी केली. आज त्यांचे वेगवेगळ्या प्रकारचे मसाले जर्मनी, जपान यासारख्या देशात देखील विकले जात आहेत. आपले घरगुती मसाले महिलांच्या पसंतीत पडत असल्याचे पाहून वंदना दाभाडे यांनी गृहलक्ष्मी फूड प्रॉडक्ट नावाने मसाला निर्मिती उद्योग सुरू केला व पुढे सासर नावाने त्यांचे मसाले प्रसिद्ध झाले. महाराष्ट्र शासनाच्या बऱ्याच योजना आहेत, या आपल्या गोरगरीब लेकरांना उद्योजक बनवू शकतात त्या योजनांचा सर्वांनी पुरेपूर लाभ घ्यावा व उद्योजक व्हावे असे आवाहन सुद्धा दाभाडे पती-पत्नीने केले आहे. वंदना दाभाडे यांच्या कार्यात त्यांचे पती संतोष दाभाडे यांनी मोलाची साथ दिली.



## विविध वृत्त...

### वीर बाल दिनानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन



दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा / प्रतिनिधी :** 'वीर बालदिवस' निमित्त आज जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन करण्यात आले. अपर जिल्हाधिकारी सदाशिव शेलार यांच्या हस्ते साहिबजादे बाबा जोरावार सिंह आणि बाबा फतेह सिंह यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी– कर्मचारी उपस्थित होते.

### पोलीस ॲक्शन मोडवर नायलॉन मांजा विक्रेत्यांवर कारवाई; दोन जण पोलिसांच्या ताब्यात

दैनिक आपला विदर्भ





**नाशिक / प्रतिनिधी :** नाशिक च्या येवला शहरात मकरसंक्रांतीच्या ३ दिवस मोठ्या प्रमाणात पतंग उत्सव साजरा होत असतो. मात्र या काळात घातक बंदी असलेल्या नायलॉन माज्याचा सर्रास वापर होत असल्याने मकरसंक्रांती पूर्वीच काही दुर्घटना घडल्याने येवला पोलीस ॲक्शन मोडवर आले असून काल मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी २ व्यक्ती कडून १९ नायलॉन मांजा चे बंडल जप्त केले असून,पोलिसांनी त्यांचे मोबाईल जप्त करत हे बंडल कोणी मागवले याचा शोध घेत असून नायलॉन मांजाचा वापर करणाऱ्यांवर कडक कारवाईचा इशारा पोलिसांनी दिला आहे.

### केळी पीक संदर्भात कृषी आयुक्ताचे पथक तालुक्यात पडताळणीसाठी दाखल

**जळगाव / प्रतिनिधी :** जळगाव जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर केळी लागवड केली जाते या केळी पिका संदर्भात शेतकऱ्यांना नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसानीला सामोरे जावे लागते, यासाठी हवामानावर आधारित केळी पीक विमा काढला जातो केळी पीक लागवडी नंतर पिक विमा काढला जातो या संदर्भात कृषी आयुक्त पुणे यांच्या वतीने चोपडा तालुक्यात केळी पीक पडताळणीसाठी पथक दाखल झालेले आहे. तालुक्यात केळीच्या शेतात जाऊन हे पथक पडताळणी करीत आहे त्यांच्यासोबत चोपडा कृषी कार्यालयाचे कर्मचारी, विमा कंपनीचे प्रतिनिधी, शेतकरी आधी प्रत्यक्ष उपस्थित आहे. तालुक्यात बोगस केळी लागवडीचा प्रकार कुठेच आढळला नसल्याचे कृषी आयुक्त पुणे यांच्या पथकातील कृषी पर्यवेक्षक तुकाराम रडे यांनी सांगितले.



# नववर्षाच्या पार्श्वभुमीवर राज्य उत्पादन शुल्क विभाग सक्रीय

## अवैध मद्य विक्री, वाहतूक प्रकरणी तक्रार नोंदविण्याची आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा / प्रतिनिधी :** नववर्षाच्या आगमनाच्या पार्श्वभुमीवर जिल्ह्यातील विविध भागात अवैध वाहतुक तसेच विक्री मोठ्या प्रमाणात होतात. अशा घटनाना प्रतिबंध घालण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभागामार्फत दि. ३१ डिसेंबरपर्यंत विशेष मोहिम राबविण्यात येत आहे. तथापि कोणत्याही अनुज्ञप्तीमध्ये विना परवाना मद्यविक्री किंवा अल्पवयीन तरुणांना दारु उपलब्ध होत असल्यास अशावर राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून कडक कारवाई केली जाणार आहे. तसेच नागरिकांनादेखील काही तक्रारी असल्यास विभागाशी संपर्क करावा, असे आवाहन राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक डॉ. पराग मो.नवलकर यांनी केले आहे.


नाताळ व नववर्ष आगमनाच्या अनुषंगाने राज्य उत्पादन शुल्क बुलढाणा कार्यालयाच्यावतीने अवैध मद्य निर्मिती, वाहतुक व विक्री वर प्रतिबंध घालण्यासाठी बुलढाणा जिल्ह्यातील कार्यक्षेत्रीय अधिकारी निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, बुलढाणा, राज्य उत्पादन शुल्क देऊळगाव राजा व राज्य उत्पादन शुल्क खामगाव व राज्य उत्पादन शुल्क, भरारी पथक यांच्याकडून जिल्ह्यातील विविध हातभट्टी ठिकाण, अवैध मद्यविक्री केंद्रावर छापे टाकुन कारवाई करणे चालु आहे. तसेच नववर्षाच्या अनुषंगाने आयोजित करण्यात येणाऱ्या पार्ट्या, हॉटेल्समध्ये होणारी मद्यविक्री यावर राज्य उत्पादन शुल्क विभागाची करडी नजर असणार आहे.

**गेल्या नऊ महिण्यात २ कोटी २८ लक्ष रुपयांचा मुद्देमाल जप्त**

राज्य उत्पादन शुल्क विभागाने अवैध विक्री, मद्यनिर्मीती व वाहतुक प्रकरणी दि. १ मार्च २०२४ पासून ते आजपर्यंत विशेष मोहिम राबवून २ कोटी २८ लक्ष ४६ हजार १७९ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आले आहेत. यामध्ये १ हजार २२९ व्यक्तीवर गुन्हे दाखल करण्यात आले असून १०४ वाहन जप्त करण्यात आले आहे, अशी माहिती राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक डॉ. पराग मो. नवलकर यांनी दिली आहे. सदर कारवाई राज्य उत्पादन शुल्क आयुक्त विजय सूर्यवंशी, संचालक प्रसाद सुर्वे साहेब व विभागीय उप–आयुक्त अर्जुन ओहोळ यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आलेली आहे. शासनाच्या नियमानुसार दारु पिण्यासाठी मद्यसेवन परवाना असणे आवश्यक आहे. बुलढाणा जिल्ह्यातील परमीट रुम, बीअरबार, वाईन शॉप, देशी दारु दुकानचालक यांना त्याबद्दल सक्त सुचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच मद्यसेवन परवाना नसल्यास व्यक्तीला व अल्पवयीन तरुणांना मद्यविक्री केल्यास अनुज्ञप्तीधारकांवार कारवाई केली जाईल, असा इशारा देण्यात आला आहे. अवैध मद्यविक्री करणाऱ्या हॉटेल्स, ढाब्याबाबत, अवैध मद्यनिर्मीती वाहतुकीबाबत माहीती देण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभागाकडील टोल फ्री नंबर १८००२३३९९९९ किंवा व्हॉटसअॅप नंबर ८४२२००११३३ वर किंवा excisesuvidha.mahaonline.gov.in या विभागाचे पोर्टलवर तात्काळ माहिती द्यावी.




# नागरे महाविद्यालयात डॉक्टर पंजाबराव देशमुख यांची १२६ वी जयंती साजरी



दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**बिबी :** स्थानिक दुसर बीड दिनांक २६ डिसेंबर २०२४ रोज गुरुवारला राष्ट्रीय सेवा योजना विभाग संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अंतर्गत नारायणराव नागरे महाविद्यालयात दुसर बीड येथे राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी तथा प्राचार्य डॉक्टर विजय नागरे यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ .पंजाबराव देशमुख यांची १२६ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली

यांप्रसंगी अध्यक्ष म्हणून प्राध्यापक मिलिंद गवई हे उपस्थित होते त्यांनी डॉक्टर पंजाबराव देशमुख यांचे शैक्षणिक कार्य विचार कृषी क्षेत्रातील योगदान राष्ट्र उभारणीमध्ये योगदान तसेच सामाजिक क्रांती अशा विचारांवर प्रकाश टाकला तसेच विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले व दर्जेदार शिक्षण घेण्यास प्रवृत्त केले. तसेच प्रमुख पाहुणे म्हणून प्रा.जगदीश यादव यांनी सुद्धा विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व प्रा. देवानंद नागरे यांनी सुद्धा आपल्या भाषणातून डॉक्टर पंजाबराव देशमुख यांच्या कार्याबद्दल तसेच सामाजिक घटकातील शोषितांना शिक्षणातून तसेच गरिबीतून वर कसे काढता येईल हे सांगितले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सानिका वाघ या विद्यार्थिनीने केले या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. नयना गवारे यांनी केले व आभार प्रदर्शन लक्ष्मण काळे या विद्यार्थ्याने केले .या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अखेर माधवराव मिटकरे प्रवासी मंडळ व पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर माध्यमीक शाळा यांची मागणी वरून हिमायतनगर बस सेवा सुरु



दैनिक आपला विदर्भ

**ढाणकी / प्रतिनिधी :** उमरखेड, ढाणकी वरून हिमायतनगर बस बंद असल्यामुळे विद्यार्थी व प्रवास्यांना ये जा करण्यासाठी खूप त्रास सहन करावा लागत होता. शाळकरी विद्यार्थी यांना फ्री पास स्वलत चा लाभ मिळत नव्हता. हिमायतनगर बस बंद असल्यामुळे त्यांना शाळेत जाण्यासाठी खाजगी वहानाने जास्त पैसे देऊन शाळेला जावे लागत,असल्यामुळे या महागाई मध्ये पालकांना आर्थिक फटका बसत होता. विद्यार्थी आणि प्रवास्यांना होणारा त्रास बघता पुण्य श्र्लोकअहिल्याबाई होळकर माध्यमीक शाळेचे मुख्यद्यापक आणि माधवराव मिटकरे प्रवाशी मंडळ यांनी बस आगार व्यवस्थापक प्रमोदिनी किनाके यांना निवेदन देऊन उमरखेड ते हिमायतनगर बस सुरु करण्यासाठी विनंती केली होती.बस आगार व्यवस्थापक किनाके मॅडमनी विद्यार्थी आणि प्रवासांची होणारी गैरसोय होत असल्याची गंभीर बाब लक्षात येताच मुख्यद्यापक आणि माधवराव मिटकरे प्रवाशी मंडळ यांच्या निवेदनाची दखल घेत बस सुरु केली.बस सुरु होताच विद्यार्थी, प्रवासी, मुख्यद्यापक आणि माधवराव मिटकरे प्रवाशी मंडळ यांनी आगार व्यवस्थापक यांचे आभार मानले.माधवराव मिटकरे प्रवाशी मंडळ चे आध्यक्ष शेख इरफान शेख गुलाब सचिव हिरासिंह चव्हाण, कार्याध्यक्ष नाथा पाटील, उपाध्यक्ष शैलेंद्र साखरे सल्लागार, विद्वान केवटे विदयार्थी युवा मोर्चा संघटना ,मा. जि.पं सदस्य रामराव गायकवाड , सदस्य बाबा खान,जन्नावार ,यांनी अथक प्रयत्न केले

# कृषि महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबिराचे उद्घाटन

दैनिक आपला विदर्भ

**उमरखेड / प्रतिनिधी :** डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ अकोला संलग्नीत व श्री शिवाजी शिक्षण संस्था पुसद संचलीत कृषि महाविद्यालय उमरखेड यांच्यावतीने राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबिराचे आयोजन दि.२६/१२/२०२४ ते ०१/०१/२०२५ पर्यंत ग्राम.बारा येथे करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांन मध्ये राष्ट्रीयत्वाची भावना व सेवा संस्कार व्हावा, तरुणांकडुन राष्ट्रसेवा घडावी युवाशक्तीचा उपयोग राष्ट्राला व्हावा या हेतूने अशा प्रकारच्या विशेष शिबिराचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना द्वारे दरवर्षी शिबिर राबवत असते.






त्याचाच एक भाग म्हणून ग्रा.म.बारा येथे नुकताच राष्ट्रीय सेवा योजना विशेष निवासी शिबिराचे उद्घाटन झाले. या विषेश शिबिराला उद्घाटक म्हणून उमरखेड – महागाव विधानसभा क्षेत्राचे आमदार मा.श्री.किसनराव वानखेडे तर, प्रमुख पाहुणे म्हणून यवतमाळ जिल्ह्या भाजप समन्वयक मा.श्री.नितीनजी भुतडा व कृषि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ आर .एम खान यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले.सर्व प्रथम राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी श्री.व्ही. बि.शिंदे यांनी राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबिर दरम्यान नियोजित सामाजिक, सांस्कृतिक कृषि महाविद्यालयातील विविध प्रदर्शीनी मतदान जनजागृती अभियान, अंधश्रद्धा निर्मूलन,नशामुक्ती इत्यादी.विषयावर कार्यशाळा माहीती संकलन व इतर कार्यक्रम संदर्भात प्रास्ताविक मांडले उपरोक्त उद्घाटन समारंभ ग्राम बारा च्या सरपंचा सौ. साधनाताई हरणे , उपसरपंच मा.श्री. नागोराव हरणे तसेच जि.प.शाळा बारा चे मुख्याध्यापक मा.श्री.जी .डी.लखमावाड ,मा.श्री रमेश काळे ( पोलिस पाटील ग्राम बारा.) व कृषि महाविद्यालयाचे सहायक शिक्षक श्री.एस.के. चिंतले , श्री.वाय.एस.वाकोडे , श्री.ए.एस.राऊत श्री.टि.ए.चव्हान. श्री.ए. बी तामसेकर व इतर शिक्षणगण उपस्थित होते. तसेच सदर कार्यक्रमाला राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबिराचे ४० स्वंयसेवक व ग्राम बारा चे ग्रामवाशी यांची विशेष उपस्थिती होती.

# आदिवासी विकास विभागाचा 'सेंट्रल किचन' उपक्रम अनुकरणीय,केंद्रीय संरक्षण राज्यमंत्री संजय सेठ यांनी केली सेंट्रल किचन ची पाहणी

दैनिक आपला विदर्भ

**नंदुरबार / प्रतिनिधी :** आदिवासी विकास विभागाने महाराष्ट्रात राबवलेला सेंट्रल किचन चा उपक्रम हा अत्यंत अनुकरणीय आणि प्रभावीपणे राबवला जात आहे, हा प्रयोग नंदुरबारच्या धर्तीवर झारखंड सारख्या आदिवासी बहुल राज्याची राजधानी रांची येथे राबवण्याचा मानस केंद्रीय संरक्षण राज्यमंत्री संजय सेठ यांनी व्यक्त केला आहे. नंदुरबार जिल्ह्याच्या दौऱ्यावर असलेल्या केंद्रीय संरक्षण राज्यमंत्री सेठ यांनी आदिवासी विकास विभागामार्फत आदिवासी विकास प्रकल्प (नंदुरबार) अंतर्गत राबवल्या जाणाऱ्या सेंट्रल किचनला भेट दिली, यावेळी जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी, जिल्हा पोलीस अधीक्षक श्रवण दत्त एस. सेंट्रल किचनचे व्यवस्थापक उपस्थित होते. महाराष्ट्रात आदिवासी विकास विभागाने राबवलेल्या नंदुरबार येथील सेंट्रल किचन या योजनेबाबत आज जाणीवपूर्वक प्रत्यक्ष भेट देवून माहिती करून घेतली. एकाच स्वयंपाक घरातून शिजलेले अत्यंत स्वच्छ, आरोग्यदायी, पौष्टिक व उल्लेखनीय म्हणजे कडधान्येयुक्त अन्न आदिवासी आश्रम शाळांमधील सुमारे १८ हजार विद्यार्थ्यांना नाश्ता, दुपारचे व रात्रीच्या जेवणात उपलब्ध करून दिले जाते आहे. आदिवासी मुलांमधील पोषण आहाराच्या समस्येवर परिणामकारक व परिपूर्ण अशी ही सेंट्रल किचन ची संकल्पना आहे. शिजवलेले अन्न अगोदर ज्यांनी तयार केले आहे, ते अगोदर चाखतात त्यामुळे त्या अन्नातील अत्यावश्यक घटक व पौष्टिकता तसेच प्रमाणबद्धता एकप्रकारे प्रमाणित केली जाते. त्यामुळे सकस आहारासाठीची मिड डे मिल ही प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची संकल्पनेतील स्वच्छता, शिक्षण आणि आरोग्याच्या निकषांवर आधारित त्रिसुत्री येथे प्रत्यक्षात यशस्वी झाल्याचे दिसत असल्याचे यांनी सांगितले.



यावेळी केंद्रीय संरक्षण राज्यमंत्री सेठ यांनी उपस्थित अधिकारी व पदाधिकारी यांच्यासमवेत संपूर्ण सेंट्रल किचन ची कार्यपद्धती जाणून घेतली. उपलब्ध यंत्रसामग्रीचा उपयोग करताना त्यातील अन्नधान्य व भाजीपाला यांची पौष्टिकता कशी जपली जाते, या बाबतचे बारकावेही त्यांनी जाणून घेतले. सेंट्रल किचनसाठी काम करणाऱ्या अधिकारी कर्मचाऱ्यांचे कौतुक करून अभिनंदन केले. तसेच तेथे तयार करण्यात आलेल्या सकस आहाराचा आस्वादही घेतला.

